वाचले :- १) आदेश क्र. लेखा/१अ/कावि/६४३/२०१७ दिनांक :- १४/६/२०१७
२) ह क्षेत्रिय कार्यालयाचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४१६ दिनांक २९/११/२०१७
४) दिनांक /१२/२०१७ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग,
क्र.लेखा/१अ/कावि/१२१०/२०१७
दि. १८/१२/२०१७

**विषय :- वित्तीय अधिकाराबाबत....**

आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध विभागांच्या कार्यालयीन कामकाजासाठी विभाग प्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. विभागप्रमुख /शाखाप्रमुख यांना वेळोवेळी वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. महानगरपालिकेमध्ये नव्याने ग व ह क्षेत्रिय कार्यालय निर्माण करण्यात आली आहेत. ह क्षेत्रिय कार्यालयाकडे विद्युत दिवाबत्ती देखभाल दुरूस्तीच्या कामाकरीता दोन हायड्रोलिक वाहने देण्यात आली आहेत. सदर दोन वाहनांकरीता दरमहा साधारणपणे र.रू.३०,०००/- इंधनाकरीता आवश्यक असलेबाबत ह क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाने प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार ह क्षेत्रिय कार्यालयाकडील दोन हायड्रोलिक वाहनांचे वाहन इंधनाकरिता र.रु ३०,०००/- स्थायी अग्रीमधन कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे नावे मंजूर करण्यास व त्याकरिता र.रु. ३०,०००/- स्थायी अग्रीमधन बिले मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रदान करणे आवश्यक आहे. याकामी मा.स्थायी समितीने ठराव क्र. १४१७ दि. २९/११/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६८ नुसार 'ह क्षेत्रिय' कार्यालयाकडील नव्याने प्राप्त झालेल्या दोन हायड्रोलिक वाहनांचे इंधनाकरिता र.रु ३०,०००/- स्थायी अग्रीमधन कार्यकारी अभियंता (विद्युत) 'ह क्षेत्रिय कार्यालय' यांचे नावे अदा करणेस व सदर खर्चाची र.रु ३०,०००/- पर्यंतची स्थायी अग्रीमधन प्रतिपूर्ती बिले मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता (विद्युत) 'ह क्षेत्रिय कार्यालय' यांना प्रदान करीत आहे.

आयुक्त
O/C पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति
१) विद्युत विभाग
'ह क्षेत्रिय' कार्यालय
२) लेखा विभाग
३) म.ले.प विभाग